नि.फौज केस क्र. ६४/२०२१
निशाणी क्र. ३९

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – बबन पांडुरंग नरवाडे
वय सुमारे - ६१ वर्षे व्यवसाय - शेती
राहणार – - पिंपळगांव सराई ता. जिल्हा – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

मी आरोपीला ओळखतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी मला जप्तीपंचनामा करण्यासाठी पोलीस स्टेशन रायपूर येथे बोलवले नव्हते. माझ्या समक्ष पोलीसांनी काही जप्त केले नाही. आता मला अभिलेखावर दाखल जप्तीपंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमे ०१ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहिस **नि.क्र. ४०** देण्यात येत आहे.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला पूरक साक्ष देत नसल्याने त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी विधिज्ञांनी मागीतली ती देण्यात आली.**
**उत्तर सुचक प्रश्न सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचे तर्फे**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२.१२.२०१९ रोजी संध्याकाळी ५.३० वा. चे दरम्यान रायपूर पोलीस स्टेशन येथे जप्तीपंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पिंपळगांव सराई येथील जीवन किराणा दुकानात नकली उंट छाप बीडी जप्ती केलेल्या होत्या आणि आरोपीने त्या नकली उंट बीडी ज्या दुकानातून खरीदी करुन आणल्या होत्या त्याचे हस्तलिखीत पावत्या जप्त करण्यासाठी मला बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी विजय भाला यांच्या दुकानातून आरोपींनी खरेदी केलेल्या नकली उंट बीडीचे हस्तलिखीत पावत्या हजर केल्या व त्या माझ्या समक्ष जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, पावती क्र. ८२ ही दि.१४.०८.२०१९ रोजीची होती. हे म्हणणे खरे नाही की, पावती क्र. ४७ ही दि.१८.०६.२०१९ रोजीची होती. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पावत्या हया विजय भाला यांच्या दुकानातून खरेदी केलेल्या नकली उंट बीडीच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी जप्तीपंचनाम्याची कार्यवाही माझ्या समक्ष केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष त्या पावत्या जप्त केल्या व तो जप्तीपंचनामा मी वाचून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे बयाण घेतले होते.

०३.          आता मला माझे बयाणातील अधोरेखांकीत भाग "अ" वाचून दाखविण्यात आला. मी माझा बयाण देते वेळेस सदरचा मजकूर पोलिसांना सांगीतला नव्हता. परंतु तो माझे  बयाणामध्ये का नमुद आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही आरोपींना मी ओळखतो.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी मी आज रोजी  खोटी साक्ष देत आहे.

उत्तरसुचक प्रश्न - संपले.

**उलटतपास आरोपी क्र. १ चे  विधिज्ञ श्री. एस.आर. सोनाळकर यांनी नाकारला**

**उलटतपास आरोपी क्र. २ चे  विधिज्ञ श्री. एस.एम. शेख यांनी नाकारला**

फेरतपास  नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.03.11 17:51:03 +0530

**( श्रीमती एस.एच. उके )**

दि. ११.०३.२०२६          न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली .